ePaper

**पश्चिम बंगालमध्ये राज्यपालांनी विसर्जित केली विधानसभा**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™



पान 3 वरुन...

एलिव्हेटेड कॉरिडॉरसाठी लांडगे यांचे स्पष्ट निर्देश

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 08 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## पाकिस्तानची १३ विमाने, ११ एअरफिल्ड उद्ध्वस्त; एअर मार्शल भारती यांची माहिती

# 'ऑपरेशन सिंदूर' म्हणजे पाकिस्तानला धडा!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर राबवण्यात आलेल्या ‘ऑपरेशन सिंदूर’च्या पहिल्या वर्षपूर्तीनिमित्त भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यावेळी पाकिस्तानने भविष्यात कोणतीही आगळीक केल्यास त्याला याहूनही कठोर प्रत्युत्तर दिले जाईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला.**

भारतीय सैन्यदलाला पूर्ण कारवाई स्वातंत्र्य देत ऑपरेशन सिंदूर राबवण्यात आले होते. या कारवाईचा उद्देश दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करणे आणि पाकिस्तानला ठोस संदेश देणे हाच होता, असे यावेळी लष्कराच्या वतीने सांगण्यात आले.

जयपूर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत हवाई दल उपप्रमुख एअर मार्शल भारती यांनी माहिती दिली. त्यांनी सांगितले की, “सीमेपलीकडून पुन्हा कोणतीही आगळीक झाली तर त्याला चोख प्रत्युत्तर दिले जाईल. कोणत्याही दहशतवादी कृत्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील.”

या संयुक्त पत्रकार परिषदेत लेफ्टनंट जनरल राजीव घई (उपसेनाप्रमुख), व्हाईस ॲडमिरल ए. एन. प्रमोद (डीजी – नौदल ऑपरेशन्स) आणि लेफ्टनंट जनरल झुबिन मिनवाला (उपप्रमुख, एकात्मिक संरक्षण दल) उपस्थित होते. एअर मार्शल भारती यांनी ऑपरेशन सिंदूरची पार्श्वभूमी स्पष्ट करताना सांगितले की, मागील वर्षी पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवून दहशतवादी तळांवर अचूक हल्ले केले. भारतीय लष्कर सदैव सज्ज असून, देशाच्या सुरक्षिततेशी तडजोड होऊ दिली जाणार नाही, असा ठाम संदेश या पत्रकार परिषदेतून देण्यात आला.




> “‘ऑपरेशन सिंदूर’ हे भारताच्या सामर्थ्याचा आणि दहशतवादाविरुद्धच्या शून्य सहनशीलतेचा ठाम संदेश होता. पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय सैन्यदलाला स्पष्ट उद्दिष्ट देण्यात आले आणि आमच्या जवानांनी अत्यंत अचूक नियोजनासह पाकिस्तानातील दहशतवादी तळ व हवाई तळ उद्ध्वस्त केले. भारत शांततेचा समर्थक आहे, पण देशाच्या सुरक्षेला हात घालणाऱ्यांना कठोर उत्तर देण्याची क्षमता आणि तयारी भारतीय सैन्याकडे आहे. सीमेपलीकडून पुन्हा कोणतीही आगळीक झाली, तर भारताचे प्रत्युत्तर याहून अधिक निर्णायक आणि सडेतोड असेल.”
>
> **- एअर मार्शल भारती**



### ऑपरेशन सिंदूर : पाकिस्तानला इशारा

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने ‘ऑपरेशन सिंदूर’द्वारे पाकिस्तानातील तळांवर अचूक हल्ले करत १३ विमाने व ११ हवाई तळ उद्ध्वस्त केले; पुढील आगळिकीला कठोर प्रत्युत्तराचा इशारा दिला.

### कुणाचे किती नुकसान झाले?

पाकिस्तानच्या नुकसानीबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, “पाकिस्तान भारताचे कोणतेही मोठे नुकसान करू शकले नाही. भारतीय लष्करी पायाभूत सुविधा किंवा नागरी संरचनांचे नुकसान झालेले नाही. कथानक किंवा खोट्या दाव्यांवर विजय मिळत नसतो; विजयाचे मोजमाप ठोस तथ्यांवर होते.”

### पाकिस्तानचे 11 हवाई तळ, 13 विमाने नष्ट

ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारताने ७ मे रोजी पाकिस्तानमधील ९ दहशतवादी तळांवर हल्ले केले. याशिवाय ११ हवाई तळांना लक्ष्य करण्यात आले. या कारवाईत जमिनीवर आणि हवाई हल्ल्यांत पाकिस्तानची १३ विमाने नष्ट करण्यात आली, तसेच सुमारे ३०० किलोमीटर अंतरावरून त्यांचे एक उच्च दर्जाचे हवाई असेट उद्ध्वस्त करण्यात आल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

# बारामती ते फलटण कनेक्शन; डॉक्टर अटकेत

## मुलीच्या गर्भपात प्रकरणातून मोठं रॅकेट उघड होणार? पोलिसांकडून तपासाला गती

**महाईन्यूज । बारामती**

**बारामती तालुक्यातील एका अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचारानंतर समोर आलेले बेकायदेशीर गर्भपाताचे प्रकरण सध्या संपूर्ण महाराष्ट्र हादरवून सोडणारे ठरले आहे. या प्रकरणाने केवळ वैद्यकीय क्षेत्रातील काळ्या बाजूवर प्रकाश टाकला नसून, ग्रामीण भागात पाय पसरलेल्या एका मोठ्या गुन्हेगारी रॅकेटचा पर्दाफाश केला आहे.**




बारामती तालुक्यातील १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणात बेकायदेशीर गर्भपात केल्याच्या आरोपावरून फलटण येथील डॉ. योगेश नरुटे याला वडगाव निंबाळकर पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईनंतर फलटण परिसरात बेकायदेशीर गर्भपाताचे रॅकेट कार्यरत असल्याचा संशय व्यक्त होत असून, प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वडगाव निंबाळकर परिसरातील अल्पवयीन मुलीवर काही दिवसांपूर्वी अत्याचार झाल्यानंतर ती गर्भवती असल्याचे समोर आले. त्यानंतर तिला उपचाराच्या नावाखाली फलटण येथील डॉ. नरुटे यांच्या खासगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, गर्भपात करताना आवश्यक वैद्यकीय नियम, शासकीय परवानगी आणि बालसंरक्षणाशी संबंधित कायद्यांचे पालन न केल्याचा आरोप डॉक्टरवर ठेवण्यात आला आहे.

या घटनेची माहिती मिळताच वडगाव निंबाळकर पोलिसांनी तपास सुरू केला. प्राथमिक चौकशीत संशय बळावल्याने पोलिसांनी डॉक्टरला ताब्यात घेत अटक केली. सहायक पोलिस निरीक्षक नागनाथ पाटील यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी (दि. ६) फलटण येथील संबंधित रुग्णालयात झाडाझडती घेण्यात आली. या वेळी महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागल्याची माहिती मिळत आहे.

दरम्यान, या प्रकरणातून फलटण परिसरात बेकायदेशीर गर्भपाताचे मोठे रॅकेट कार्यरत असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या रॅकेटमध्ये दलाल, मध्यस्थ तसेच इतर वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्तींचा सहभाग असू शकतो, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. पोलिसांकडून रुग्णालयातील उपचार नोंदी, वैद्यकीय कागदपत्रे आणि गर्भपात प्रक्रियेची माहिती तपासली जात आहे. तसेच पीडित मुलीला फलटणपर्यंत कोणी नेले, डॉक्टरशी संपर्क कसा साधला गेला, याबाबतही चौकशी सुरू आहे.

### पोलिसांचा पुढील तपास

या प्रकरणातील मुख्य आरोपीचाही शोध सुरू असून आणखी काही आरोपी निष्पन्न होण्याची शक्यता आहे. पुढील काळात अटकसत्र वाढण्याची चिन्हे आहेत. या घटनेमुळे बारामती व फलटण परिसरांत संतापाची लाट उसळली असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक नागनाथ पाटील व त्यांच्या पथकाकडून सुरू आहे.

# पीएमपीएमएलचे अध्यक्ष महेश आव्हाड यांच्या वाहनाचा भीषण अपघात

**महाईन्यूज । नसरापूर**

**मुंबईहून पुण्याकडे येत असताना पीएमपीएमएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांच्या वाहनाला मळवली परिसरात भीषण अपघात झाला. या अपघातात वाहनचालक आणि बॉडीगार्ड गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुदैवाने महेश आव्हाड यांना किरकोळ दुखापत झाली असून ते थोडक्यात बचावले आहेत.**



अपघातानंतर बोलताना महेश आव्हाड यांनी सांगितले की, "नशीब बलवत्तर म्हणून आम्ही वाचलो. एका मोबाईल मिनी व्हॅन चालकाने अत्यंत बेशिस्तपणे रस्त्यात अचानक यू-टर्न घेतल्यामुळे आमच्या वाहनाचा भीषण अपघात झाला."

या धडकेत वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून गाडीचा पुढील भाग पूर्णपणे चुराडा झाल्याची माहिती मिळत आहे. अपघात इतका गंभीर होता की चालक आणि सुरक्षा रक्षकाला तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागले.

महेश आव्हाड यांनीही या अपघातात किरकोळ मार लागल्याचे सांगितले. सध्या त्यांच्यावरही वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुरू आहेत. अपघातानंतर काही काळ परिसरात वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. स्थानिक नागरिक आणि पोलिसांच्या मदतीने जखमींना तातडीने उपचारासाठी हलवण्यात आले. दरम्यान, या अपघातामुळे पुन्हा एकदा महामार्गावरील बेशिस्त वाहनचालकांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. अचानक यू-टर्न आणि वाहतुकीचे नियम न पाळल्यामुळे गंभीर अपघात घडत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

### सुरक्षेच्या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह

या घटनेनंतर महामार्गावरील सुरक्षेच्या उपाययोजनांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिस आणि महामार्ग सुरक्षा पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. प्राथमिक तपासात मोबाईल मिनी व्हॅन चालकाच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी संबंधित वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या अपघातामुळे काही काळ मुंबई-पुणे महामार्गावरील वाहतूक मंदावली होती.

# एलिव्हेटेड कॉरिडॉरसाठी लांडगे यांचे स्पष्ट निर्देश

## प्राधिकरणाच्या जागेचा वापर करण्याचे निर्देश; भूसंपादनात पारदर्शकतेवर जोर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रकल्प हा पिंपरी-चिंचवडच्या भविष्यातील वाहतूक व्यवस्थेचा महत्त्वाचा आधार ठरणार असून, विकासकामांसोबतच शेतकरी व नागरिकांच्या हितालाही प्राधान्य द्यावे, अशा सूचना भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.**

या प्रकल्पासंदर्भात महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत नगर रचना विभाग आणि भू संपादन विभागाची संयुक्त बैठक घेण्यात आली. बैठकीत रॅम्प नियोजन, भूसंपादन प्रक्रिया आणि नागरिकांच्या अडचणींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

आमदार लांडगे यांनी प्रशासनाला स्पष्ट सूचना देताना भोसरी, मोशी आणि बोऱ्हाडेवाडी येथे रॅम्पसाठी शेतकऱ्यांची नव्याने जमीन संपादित न करता प्राधिकरणाच्या उपलब्ध जागेचा वापर करावा, असे सांगितले. तसेच इंद्रायणी नदी परिसरातील रॅम्प हा सोसायटीलगत न करता नदीपलीकडे नियोजित करण्याचे निर्देश दिले.

ई प्रभाग कार्यालयाजवळील दोन्ही रॅम्प साईनाथ हॉस्पिटल परिसरात एका बाजूस करण्यात यावेत, जेणेकरून नागरिकांना चौक ओलांडण्याची गरज भासणार नाही आणि वाहतूक अधिक सुरक्षित व सुलभ होईल, अशी सूचना त्यांनी केली. प्रदर्शन केंद्राजवळ स्वतंत्र



रॅम्प उतरवण्याचाही निर्णय बैठकीत घेण्यात आला.

भूसंपादन प्रक्रियेदरम्यान सुनावणीसाठी येणाऱ्या प्रत्येक नागरिकांचे समाधान होईल, याची प्रशासनाने विशेष काळजी घ्यावी, असे निर्देशही आमदार लांडगे यांनी दिले. भोसरी गावठाणातील ४५ मीटर गावठाण हद्द वगळून ६१ मीटर रुंदीकरणाचे रेखांकन नागरिकांना स्पष्टपणे समजावून सांगण्याच्या सूचनाही प्रशासनाला देण्यात आल्या.

संपूर्ण भूसंपादन प्रक्रिया गतीने आणि पारदर्शकपणे पूर्ण करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. या प्रकल्पामुळे भविष्यातील वाहतूक कोंडी कमी होऊन परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

> “नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर हा केवळ विकासाचा प्रकल्प नाही, तर पिंपरी-चिंचवडच्या भविष्यातील वाहतूक व्यवस्थेचा मजबूत पाया आहे. हा प्रकल्प राबवताना शेतकरी, स्थानिक नागरिक आणि परिसराच्या हिताला कुठेही धक्का लागणार नाही, याची आम्ही पूर्ण काळजी घेत आहोत. भूसंपादन प्रक्रियेत प्रत्येक नागरिकाला न्याय मिळेल, पारदर्शकता राखली जाईल आणि विकासासोबत लोकांचा विश्वासही अबाधित ठेवला जावा, अशी सूचना प्रशासनाला केली आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# मराठीला प्रशासनाची मुख्य भाषा करण्याचा ऐतिहासिक निर्णय

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा १०० टक्के व अधिकाधिक प्रभावी वापर सुनिश्चित करण्याचा ऐतिहासिक निर्णय नुकत्याच पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आला. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि कर्मचारी वर्गामध्ये मराठीच्या उच्च शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी विधी समिती सभापती सुजाता निलेश बोराटे सातत्याने पाठपुरावा करत होत्या.**

### मराठी पदवीधारक कर्मचाऱ्यांना दोन अतिरिक्त वेतनवाढीचा लाभ

या ठरावाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे, वर्ग-३ मधील कर्मचारी वर्गाने स्वतःच्या प्रयत्नातून एम.ए. (मराठी) ही पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्यास त्यांना दोन अतिरिक्त वेतनवाढीचा लाभ देण्यास मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे कर्मचारी वर्गामध्ये मराठी भाषेच्या उच्च शिक्षणाबाबत निश्चितच प्रेरणा निर्माण होईल, तसेच प्रशासनातील भाषिक अचूकता, दर्जा आणि व्यावसायिकता अधिक वाढण्यास मदत होणार आहे.



### प्रारुप विकास आराखडा प्रथमच मराठीत..!

यावर्षी महापालिकेच्या इतिहासात प्रथमच प्रारुप विकास आराखडा मराठी भाषेत तयार केला जात आहे, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. नागरिकांना शहराच्या विकास नियोजनाची माहिती त्यांच्या मातृभाषेत मिळावी, नागरिकांचा सहभाग वाढावा आणि प्रशासन अधिक पारदर्शक व्हावे, या दृष्टीने हा निर्णय मैलाचा दगड ठरणार आहे.

> “मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नाही, तर ती ज्ञान, संस्कृती आणि रोजगाराचीही भाषा व्हावी, हा आमचा ठाम उद्देश आहे. प्रशासनात मराठीचा प्रभाव वाढवणे म्हणजे सामान्य नागरिकांना प्रशासनाच्या अधिक जवळ नेणे होय.” मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने घेतलेला हा निर्णय राज्यभरासाठी आदर्श ठरेल, असा विश्वास आहे.
>
> **- सुजाता बोराटे, सभापती, विधी समिती**

त्या अनुषंगाने हा विषय सर्वसाधारण सभेमध्ये नगरसेविका वर्षा जगताप यांनी मांडला व त्यास सुजाता बोराटे यांनी अनुमोदन देत सविस्तर मागणी केली. शहराचे महापौर रवी लांडगे तसेच महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी या विषयाला सकारात्मक प्रतिसाद देत सभागृहाने एकमताने मंजुरी दिली.

या निर्णयानुसार, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या दैनंदिन प्रशासकीय व्यवहारात, कार्यालयीन पत्रव्यवहारात, नोटशीट्स, आदेश, अहवाल, नागरिकांशी संवाद आदी सर्व पातळ्यांवर मराठी भाषेचा प्रभावी आणि सन्मानपूर्वक वापर बंधनकारक करण्यात येणार आहे. ही केवळ प्रशासकीय सुधारणा नसून, शहराच्या भाषिक आणि सांस्कृतिक अस्मितेचा गौरव करणारी भूमिका असल्याचे मत सभापती सुजाता बोराटे यांनी यावेळी व्यक्त केले.



## भूमिका

**'आमची जनगणना, आमचा विकास' हे ब्रीद घेऊन देशात सुरू झालेली 2027 ची जनगणना ही केवळ लोकसंख्या मोजण्याची प्रक्रिया नसून, भारताच्या भविष्यातील विकासाचा पाया ठरणारी राष्ट्रीय मोहीम आहे. डिजिटल पद्धतीने होत असलेली ही पहिली जनगणना असल्याने तिच्याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.**

# डिजिटल इंडियाची जनगणना



प्रत्येक नागरिकाने प्रामाणिकपणे सहभाग नोंदविल्यासच या उपक्रमाचे खरे यश निश्चित होणार आहे. भारतात जनगणनेची परंपरा अत्यंत प्राचीन आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही जनगणनेचा उल्लेख आढळतो. त्या काळात महसूल, शेती, व्यापार, स्थलांतर आणि लोकसंख्येची माहिती गोळा करण्यासाठी गणना केली जात असे. आधुनिक भारतात 1881 पासून नियमित जनगणना सुरू झाली आणि त्यानंतर दर दहा वर्षांनी ती होत आली. स्वातंत्र्यानंतरची ही आठवी जनगणना असून, तब्बल सोळा वर्षांनंतर ती होत असल्याने तिचे महत्त्व अधिक वाढले आहे. जनगणना म्हणजे केवळ माणसांची संख्या मोजणे नव्हे. ती देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचे प्रतिबिंब असते.

लोकसंख्यावाढ, जन्मदर, मृत्युदर, स्थलांतर, साक्षरता, रोजगार, ग्रामीण-शहरी विभागणी, वयोगट, व्यावसायिक रचना अशा अनेक महत्त्वाच्या बाबींची माहिती जनगणनेतून मिळते. ही आकडेवारी शासनासाठी विकासाचा दिशादर्शक ठरते. कोणत्या भागात शाळांची गरज आहे, कुठे रुग्णालये अपुरी आहेत, कोणत्या क्षेत्रात रोजगारनिर्मिती करावी, कोणत्या भागात पाणी किंवा निवासाची समस्या आहे, याचा अचूक अंदाज जनगणनेतूनच येतो. आज देशासमोर बेरोजगारी, लोकसंख्यावाढ, शहरीकरण, स्थलांतर, आरोग्य व शिक्षणाच्या समस्या उभ्या आहेत. या समस्यांची मूळ कारणे समजून घेण्यासाठी विश्वासार्ह आकडेवारी आवश्यक असते. चुकीच्या माहितीवर आधारित धोरणे अपयशी ठरू शकतात. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने खरी, सविस्तर आणि अचूक माहिती देणे हे राष्ट्रीय कर्तव्यच आहे. जनगणनेतील माहिती गोपनीय ठेवली जाते, त्यामुळे नागरिकांनी कोणतीही भीती न बाळगता सहभाग घ्यायला हवा.यंदाच्या जनगणनेतील 'स्वयंगणना' ही संकल्पना विशेष महत्त्वाची आहे. नागरिकांना ऑनलाइन पद्धतीने स्वतःची माहिती भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि अचूक होण्यास मदत होईल. त्याचबरोबर डिजिटल साक्षरतेलाही चालना मिळेल.

भारत महासत्तेकडे वाटचाल करीत असताना विकासाचा मजबूत आराखडा तयार करण्यासाठी अचूक जनगणना अत्यावश्यक आहे. देशाच्या नियोजनाची, अर्थव्यवस्थेची आणि सामाजिक धोरणांची भक्कम पायाभरणी जनगणनेवरच उभी असते. म्हणूनच जनगणना ही केवळ सरकारी प्रक्रिया नसून प्रत्येक भारतीयाची सामूहिक जबाबदारी आहे. "आमची जनगणना, आमचा विकास" हे ब्रीद खऱ्या अर्थाने साकारायचे असेल, तर प्रत्येकाने सजगपणे सहभागी होणे ही काळाची गरज आहे.

## प्रासंगिक »

### खोटा पैसा


**एकदा पंडित दीनदयाळ उपाध्याय बाजारात भाजी घेण्यासाठी गेले होते. त्यांनी एका वृद्ध महिलेकडून भाजी विकत घेतली आणि पैसे देऊन घरी परतले.**

घरी आल्यावर हिशोब लिहिताना त्यांच्या लक्षात आले की, खिशातील एक खोटा पैसा चुकून त्या वृद्ध महिलेला दिला गेला आहे. ही गोष्ट त्यांच्या मनाला फार लागली. नकळत का होईना, आपण एखाद्याला फसवले याचे त्यांना खूप दुःख झाले. ते ताबडतोब पुन्हा बाजारात गेले. त्या वृद्ध महिलेसमोर जाऊन त्यांनी नम्रपणे सांगितले, "बाई, माझ्याकडून चुकून तुम्हाला खोटा पैसा दिला गेला आहे." ती महिला म्हणाली, "अहो, राहू द्या. एका पैशासाठी एवढं काय?" पण दीनदयाळजी शांतपणे म्हणाले, "नाही बाई, माझी चूक मी सुधारली पाहिजे." महिलेने गल्ल्याची पेटी त्यांच्यासमोर ठेवली. त्यांनी काळजीपूर्वक शोध घेतला आणि खोटा पैसा काढून त्याजागी खरा पैसा ठेवला. त्यांच्या प्रामाणिकपणाने ती वृद्ध महिला भारावून गेली आणि तिने मनापासून त्यांना आशीर्वाद दिला.

- तात्पर्य : आदर्श आचरण आणि प्रामाणिकपणाची सुरुवात स्वतःपासूनच केली पाहिजे.

**राज्यात यंदा उन्हाळ्याची तीव्रता विक्रमी पातळीवर पोहोचताना दिसत आहे. विदर्भातील अनेक शहरांत तापमानाने ४६ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला, तर राज्यातील बहुतांश भागांत ४० अंशांपेक्षा अधिक तापमानाची नोंद झाली.**

# 'ग्लोबल वॉर्मिंग'मुळे उन्हाळा इतका असह्य झाला आहे?




विशेष म्हणजे, दिवसाबरोबरच रात्रीचे तापमानही वाढल्याने नागरिकांना उष्म्यापासून दिलासा मिळत नाही. परिणामी आरोग्याच्या समस्या, मानसिक अस्वस्थता आणि दैनंदिन जीवनातील अडचणी वाढताना दिसत आहेत. अशा परिस्थितीत उष्म्याची कारणे समजून घेणे महत्त्वाचे ठरते. मात्र, समाज माध्यमांवरून याबाबत अनेक चुकीच्या आणि अवैज्ञानिक गोष्टी पसरवल्या जात आहेत. 'एल-निनो', जागतिक तापमानवाढ किंवा इतर घटकांशी सध्याच्या उष्म्याचा थेट संबंध जोडण्याचा प्रयत्न होत आहे. प्रत्यक्षात, महाराष्ट्रात सध्या निर्माण झालेली प्रति-चक्रवाती स्थिती हा उष्म्याच्या वाढीमागील प्रमुख घटक आहे. वातावरणातील विशिष्ट उंचीवर निर्माण होणाऱ्या या स्थितीमुळे हवा खालच्या दिशेने दाबली जाते, हवा खेळती राहत नाही आणि तापमानात मोठी वाढ होते. निरभ्र आकाशामुळे सूर्यकिरणांचा परिणाम अधिक तीव्र होतो.

उष्म्याच्या या लाटेचा संबंध तातडीने 'एल-निनो' किंवा जागतिक तापमानवाढीशी जोडणे वैज्ञानिक दृष्ट्या योग्य नाही. हवामानातील बदलांचे निष्कर्ष काढण्यासाठी अनेक दशकांची आकडेवारी आवश्यक असते. त्यामुळे अफवा आणि अर्धवट माहितीवर विश्वास ठेवण्याऐवजी वैज्ञानिक माहिती समजून घेणे गरजेचे आहे. मात्र, या परिस्थितीसाठी मानवी हस्तक्षेप काही प्रमाणात जबाबदार असल्याचे नाकारता येणार नाही. शहरांमधील वाढते काँक्रिटीकरण, झाडांची कमतरता, मोकळ्या जागांचा अभाव आणि अयोग्य बांधकाम रचना यामुळे 'अर्बन हीट आयलंड'ची समस्या निर्माण होत आहे. परिणामी शहरांतील तापमान अधिक वाढते आणि उष्म्याची दाहकता तीव्र बनते.

हवामानावर पूर्ण नियंत्रण माणसाच्या हातात नसले, तरी त्याचे परिणाम कमी करणे नक्कीच शक्य आहे. शहरांचे शास्त्रशुद्ध नियोजन, वृक्षारोपण, मोकळ्या जागांचे संरक्षण आणि पर्यावरणपूरक बांधकामे यांवर भर देणे काळाची गरज आहे. अन्यथा भविष्यात शहरे आणि गावे राहण्यायोग्य राहतील का, हा गंभीर प्रश्न उभा राहू शकतो. त्यामुळे उष्म्याच्या संकटाकडे केवळ नैसर्गिक आपत्ती म्हणून न पाहता, पर्यावरणीय जबाबदारी म्हणून पाहण्याची गरज आहे.

## ।। अभंगवाणी ।।



सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती ।
रखुमाईच्या पती सोयरिया ॥१॥

गोड तुझें रूप गोड तुझें नाम ।
देईं मज प्रेम सर्व काळ ॥ध्रु.॥ - संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# एकनाथ शिंदे यांचे हेलिकॉप्टर भरकटले

## ठाणे हद्दीच्या ग्रामीण पट्ट्यातील वादळाचा उपमुख्यमंत्र्यांच्या हेलिकॉप्टरला फटका

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हेलिकॉप्टरबाबत आज दुपारी घडलेली एक महत्त्वाची घटना सुदैवाने कोणतीही दुर्घटना न घडता टळली. खराब हवामान आणि अचानक समोर आलेल्या वादळामुळे हेलिकॉप्टरला नियोजित मार्गावरून परत फिरावे लागले. मात्र पायलटच्या प्रसंगावधानामुळे आणि योग्य वेळी घेतलेल्या निर्णयामुळे मोठा अनर्थ टळला असून, उपमुख्यमंत्री शिंदे यांच्यासह हेलिकॉप्टरमधील सर्वजण सुखरूप असल्याची माहिती समोर आली आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आज आपल्या पक्षातील एका पदाधिकाऱ्यांच्या कुटुंबातील विवाह सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी मुंबईहून मुरबाडकडे रवाना झाले होते. दुपारी साधारणपणे ३.३० वाजण्याच्या सुमारास त्यांनी मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्स येथील हेलिपॅडवरून हेलिकॉप्टरद्वारे उड्डाण केले. सुरुवातीला प्रवास सुरळीत सुरू होता. मात्र हेलिकॉप्टर जेमतेम ऐरोली परिसरापर्यंत पोहोचले असताना हवामानात अचानक बदल झाला आणि समोरून तीव्र वादळ येत असल्याचे पायलटच्या निदर्शनास आले.

हवामानाचा अंदाज घेताच पायलटने परिस्थितीचे गांभीर्य ओळखले. संभाव्य धोका लक्षात घेऊन त्याने तातडीने उपमुख्यमंत्री शिंदे यांना परिस्थितीची माहिती दिली. खराब हवामानामुळे पुढे जाणे धोकादायक ठरू शकते, असे स्पष्ट करत त्याने हेलिकॉप्टर मागे वळवण्याचा निर्णय घेतला. सुरक्षिततेला प्राधान्य देत घेतलेल्या या निर्णयामुळे मोठा धोका टळल्याचे बोलले जात आहे.

यानंतर पायलटने अतिशय कौशल्याने हेलिकॉप्टर पुन्हा मुंबईच्या दिशेने वळवले. काही मिनिटांच्या उड्डाणानंतर जुहू येथील पवनहंस हेलिपॅडवर हेलिकॉप्टरचे सुरक्षित आणि यशस्वी लँडिंग करण्यात आले. या संपूर्ण घटनेदरम्यान हेलिकॉप्टरमध्ये उपस्थित असलेल्या सर्वांनी संयम राखला होता. हेलिकॉप्टर सुरक्षितपणे उतरल्याने सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला.

या घटनेनंतर राजकीय वर्तुळात तसेच शिंदे समर्थकांमध्ये काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. हेलिकॉप्टर भरकटल्याची माहिती समोर आल्यानंतर अनेकांनी उपमुख्यमंत्र्यांच्या सुरक्षिततेबाबत विचारणा सुरू केली होती. मात्र काही वेळातच हेलिकॉप्टर सुरक्षित उतरल्याची माहिती अधिकृतपणे समोर आल्यानंतर सर्वांनी समाधान व्यक्त केले.

### हवामानातील अचानक बदल

सध्या राज्यात अनेक भागांत अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि हवामानातील अचानक बदल पाहायला मिळत आहेत. त्यामुळे हवाई वाहतुकीवरही त्याचा परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. आजच्या घटनेने पुन्हा एकदा हवामानाचा अचूक अंदाज आणि सुरक्षिततेच्या नियमांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हेलिकॉप्टरला आलेल्या या अनपेक्षित अडचणीमुळे काही काळ तणाव निर्माण झाला असला, तरी पायलटच्या तत्परतेमुळे आणि सुरक्षिततेला प्राधान्य दिल्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

# कसा घडला बीड जिल्ह्यातील २४१ कोटी रुपयांचा घोटाळा?

**महाईन्यूज । बीड**

**धुळे – सोलापूर राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनातील वाढीव मोबदल्याच्या १५४ प्रकरणात २४१ कोटी ६२ लाख रुपयांच्या घोटाळ्यात तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना बीड पोलिसांनी गुरुवारी अटक केली. या प्रकरणात ७२ कोटी रुपयांचा वाढीव मोबदला वाटप करुन अपहार झाला होता. या प्रकरणी बीडच्या शिवाजी पोलीस ठाण्यात पूर्वी दहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता.**



या प्रकरणातील कागदपत्रांमध्ये अविनाश पाठक यांच्या स्वाक्षरीबाबतचे अहवाल तपासल्यानंतर त्यांना चौकशीसाठी लातूरहून ताब्यात घेण्यात आले. भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यास अटक होण्याची अलिकडच्या काळातील ही पहिलीच वेळ असल्याने खळबळ उडाली आहे. पण हा घोटाळा घडला कसा ? याचे तपशील कमालीचे रंजक आहेत.

अविनाश पाठक यांची २२ एप्रिल २०२५ मध्ये बदली झाली. त्यांच्या जागी विवेक जॉन्सन रुजू झाले. नवे जिल्हाधिकारी रुजू झाल्यानंतरही अनेक प्रकरणात जुन्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सह्या होत आणि वाढीव मोबदल्याची प्रकरणे मंजूर होत. ही प्रक्रिया सलग पाच – सहा महिने सुरू होती. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अशा प्रकरणाची तपासणी केली.

वाढीव मोबदल्याच्या लवाद प्रकरणात १७ एप्रिल २०२५ अशी तारीख नमूद करुन पाच महिने उशिरा भूसंपादनाच्या वाढीव मोबदला मंजूर झाल्याची प्रकरणे दाखल करण्यात आली. भूसंपादनाची मूळ रक्कम ६८ कोटी रुपये असताना वाढीव मंजूर मोबदला ३१० कोटी २० लाख रुपये दाखविण्यात आला. हा मंजूर मोबदला राष्ट्रीय महामार्गाच्या कार्यालयाकडून मिळाल्यानंतर त्यांनी ७२ कोटी रुपयांचे वितरणही करण्यात आले.

मात्र, वाढीव मोबदला मंजूर जिल्हाधिकाऱ्यांच्या समोर सुनावणी होणे अपेक्षित असते. त्यासाठी संबंधितांना नोटिसाही द्याव्या लागतात. नोटीसा देणे, संबंधित शेतकरी किंवा त्यांचे वकिल कार्यालयात हजर असल्याच्या नोंदी शासकीय दप्तरी असतात. पण या प्रकरणात संबंधित हजर नसताना सुनावणी झाली आणि मोबदला मंजूर करण्यात आला. असे लक्षात आल्यानंतर १५४ प्रकरणाची चौकशी करण्याचे ठरविण्यात आले.

### या पूर्वीच्या गुन्ह्यातसुद्धा दहा जण आरोपी

कर्मचाऱ्यांचे संभाषण समोर आल्यानंतर त्यांनी पोलिसात तक्रार दाखल केली होती. यात ४० लवाद प्रकरणात वाढीव मोबदल्याचे आदेश होतील, असे संभाषणही होते. या आधारे परळी तहसील कार्यालयातील प्रमुख अधिकारी संजय हंगे, कंत्राटी कर्मचारी अविनाश चव्हाण , जायकवाडीच्या भूसंपादन कार्यालयातील कंत्राटी तत्वावर काम करणारा शेख अजहर शेख बाबू, सेवानिवृत्त कर्मचारी त्र्यंबक पिंगळे, पांडुरंग पाटील यांच्यासह चार वकिलांचा सहभाग आहे. यामध्ये ॲड. एस. एम. नन्नवरे, ॲड. पिसुरे, ॲड. प्रवीण राख, ॲड. नरवाडकर यांच्या नावाचा समावेश आहे. या सर्व कर्मचाऱ्यांनी कट करुन वाढीव मोबदल्यातून पैसे मिळविण्यासाठी हे घडवून आणल्याचा आरोप ठेवण्यात आला. ७३ कोटी रुपये ४ लाख रुपये वाटून त्याचा फायदा या कर्मचाऱ्यांनी घेतला.

# इराणचा अमेरिकेला मोठा तडाखा!

## १५ तळांवरील २२८ मालमत्ता उद्ध्वस्त; सॅटेलाईट फोटोंनी उघड केली सत्य परिस्थिती

**महाईन्यूज । इराण**

**मध्यपूर्वेतील अमेरिकीच्या लष्करी तळांवर इराणने केलेल्या हवाई हल्ल्यांमध्ये डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने मान्य केल्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त नुकसान झाले आहे. इराणच्या सरकारी वृत्तवाहिन्यांनी जारी केलेल्या सॅटेलाईट फोटोंमधून ही बाब समोर आली आहे.**




वॉशिंग्टन पोस्टने राबवलेल्या शोध मोहिमेत, इराणच्या यासंबंधीच्या दाव्यांना दुजोरा मिळाला आहे. या चौकशीत असे समोर आले आहे की, २८ फेब्रुवारी रोजी युद्ध सुरू झाल्यापासून इराणच्या हल्ल्यांमुळे मध्यपूर्वेतील अमेरिकन लष्करी तळांवरील किमान २२८ इमारती किंवा उपकरणांचे नुकसान झाले आहे किंवा ते पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहेत.

इराणच्या हल्ल्यादरम्यान लक्ष्य ठरलेल्या गोष्टींमध्ये, मध्यपूर्वेतील अमेरिकेच्या तळांवरील हँगर्स, बरकी, इंधनाचे डेपो, विमाने आणि महत्त्वपूर्ण रडार, कम्युनिकेशन आणि एअर डिफेन्स सिस्टम्स यांचा समावेश होता.

वॉशिंग्टन पोस्टने दिलेल्या वृत्तानुसार, मध्यपूर्वेतील तळावर झालेल्या नुकसानाची व्याप्ती ही अमेरिकन सरकारने यापूर्वी मान्य केलेल्यापेक्षा खूप जास्त आहे. अधिकाऱ्यांच्या हवाल्याने या रिपोर्टमध्ये सांगण्यात आले आहे की, या प्रदेशातील अमेरिकेचे काही लष्करी तळ हे सामान्य कर्मचाऱ्यांना ठेवण्यासाठी अत्यंत धोकादायक झाले होते आणि युद्धाच्या सुरुवातीलाच कमांडर्सनी या तळांवरील बहुतेक कर्मचाऱ्यांना हा तळांवरून इराणच्या हल्ल्याच्या टप्प्याबाहेर असलेल्या सुरक्षित स्थळांवर हलवले

युद्ध सुरू झाल्यापासून मध्यपूर्वेत किमान सात अमेरिकन सर्व्हिस मेंबर्सचा मृत्यू झाला. यापैकी सहा जणांचा कुवैतमध्ये तर एकाचा सौदी अरेबिया येथे मृत्यू झाला. याबरोबरच इतर ४०० जवान देखील जखमी झाले.

मार्च महिन्याच्या मध्यापासून मध्यपूर्वेतील सॅटेलाईट फोटो (Satellite Imagery) मिळवणे कठीण झाले आहे. कारण वँटोर आणि प्लॅनेट लॅब्स या दोन प्रमुख सॅटेलाईट फर्म युद्ध सुरू आहे तोपर्यंत या प्रदेशाचे फोटो मर्यादित करणे किंवा ते देणे लांबणीवर टाकणे किंवा प्रसिद्ध न करण्याबाबतच्या अमेरिकन सरकारच्या सूचनांचे पालन करत आहेत.

अमेरिकन सरकार या सॅटेलाईट इमेजरीचा सर्वात मोठे खरेदीदार आहेत, ज्यामुळे अमेरिका वँटोर आणि प्लॅनेट या कंपनीचा सर्वात मोठा ग्राहक आहे.

युद्ध सुरू झाल्यानंतर दोन आठवड्यांच्या आतच या सूचना देण्यात आल्याने इराणने केलेल्या प्रतिहल्ल्यांच्या नुकसानीचा अंदाज लावणे प्रसारमाध्यमांसाठी कठीण झाले आहे.

असे असले तरी, इराणच्या सरकारी प्रसारमाध्यमांकडू युद्ध सुरू झाल्यापासून या प्रदेशाची उच्च दर्जाचे सॅटेलाईट फोटो सोशल मीडियावर नियमितपणे प्रसिद्ध केली जात आहेत. मात्र, ही छायाचित्रे बनावट असू शकतात, या भीतीने जागतिक स्तरावर त्यांना फारशी प्रसिद्धी देण्यात आली नाही.

### पडताळणीत काय समोर आले?

वॉशिंग्टन पोस्टने राबवलेल्या शोधमोहिमेत, अशा शेकडो फोटोंचा आढावा घेतला गेला. त्यांनी यापैकी १०९ फोटोंची सत्यता पडताळून पाहिली. यासाठी त्यांनी युरोपियन युनियनच्या सॅटलाईट सिस्टमधील लोवर रिझॉल्युशन फोटोंशी, तसेच उपलब्ध असल्यास प्लॅनेट कंपनीकडील हाय रिझॉल्युशन फोटोशीं या फोटोंची तुलना केली. या शोधामध्ये इराणने जारी केलेले फोटो बनावट असल्याचा एकही पुरावा आढळून आला नाही. एकंदरीत, या रिपोर्टमध्ये आढळून आले की, या प्रदेशातील किमान १५ लष्करी तळांवरील २१७ इमारती आणि ११ उपकरणांचे नुकसान झाले किंवा ते उद्ध्वस्त करण्यात आली.

# पश्चिम बंगालमध्ये राज्यपालांनी विसर्जित केली विधानसभा

**महाईन्यूज । पश्चिम बंगाल**

**पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीनंतर तेथे सुरू असलेल्या राजकीय नाट्यावर अखेर पडदा पडला आहे. कारण पश्चिम बंगालचे राज्यपाल आर. एन. रवी यांनी विधानसभा विसर्जित केली आहे. त्यामुळे पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसच्या सरकार अधिकृतपणे संपुष्टात आले आहे.**



भारतीय संविधानाचे कलम १७४ (२)(बी) अंतर्गत मिळणाऱ्या घटनात्मक अधिकारांचा वापर करत राज्यपालांनी मंत्रिमंडळ बरखास्त केले आहे. अधिकृत नोटीसमध्ये आर.एन. रवी यांनी याबद्दलची घोषणा केली आहे.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत टीएमसीला मोठा पराभव सहन करावा लागला असून भाजपाने बहुमत मिळवले आहे. मात्र या पराभवानंतर ममता बॅनर्जी यांनी पत्रकार परिषद घेत भाजपा आणि निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले. यावेळी ममता बॅनर्जी यांनी नैतिकदृष्ट्या टीएमसी जिंकली आहे, तर मी राजीनामा का देऊ? म्हणत मुख्यमंत्री पद सोडण्यास नकार दिला होता.

"मी राजीनामा देणार नाही. कारण मी निवडणूक हरलेली नाही. मी राजभवनात जाणार नाही. कारण हा प्रश्नच उद्भवत नाही. मला हेही सांगायचं आहे की आम्ही निवडणुका हरलेलो नाही. हा आम्हाला पराभूत करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. निवडणूक आयोगाशी संगनमत करून ते आम्हाला पराभूत करत असतील, पण नैतिकदृष्ट्या आम्ही निवडणुका जिंकल्या आहेत", असं ममता बॅनर्जी म्हणाल्या होत्या.

४ मे रोजी जाहीर झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक निकालांमध्ये भाजपाने २०७ जागा जिंकत बहुमताचा आकडा गाठला आहे, तर टीएमसीला ८० जागांवर विजय मिळाला आहे.

### आता मुख्यमंत्री कोण होणार?


दरम्यान ८ मे रोजी भाजपा विधिमंडळ पक्षाची बैठक होणार असून, त्यामध्ये पक्षाच्या विधिमंडळ नेत्याची निवड केली जाईल. २०२१ मध्ये भाजपाने सुवेंदु अधिकारी यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड केली होती आणि त्यांनी विरोधी पक्षनेते म्हणून जबाबदारी पार पाडली होती. आता भाजपा ज्याची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करेल, तीच व्यक्ती राज्याची पुढील मुख्यमंत्री बनेल. त्यामुळे पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी कोणाकडे सोपवली जाते याकडे सध्या सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ‘रीसेट’ चित्रपटाची अधिकृत घोषणा

बॉलिवूडची ‘देसी गर्ल’ प्रियंका चोप्रा (PRIYANKA CHOPRA ) सध्या हॉलिवूडमध्ये मोठं नाव कमावत आहे. अभिनय, निर्मिती आणि ग्लोबल प्रोजेक्ट्समुळे ती सतत चर्चेत असते. आता प्रियंकाच्या चाहत्यांसाठी आणखी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. प्रियंका लवकरच ‘रीसेट’ नावाच्या नव्या हॉलिवूड चित्रपटात झळकणार असून या चित्रपटात तिच्यासोबत प्रसिद्ध हॉलिवूड अभिनेता ‘ऑरलँडो ब्लूम’ दिसणार आहे. ‘रीसेट’ हा एक सर्व्हायवल थ्रिलर चित्रपट असणार आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन मॅट स्मूकलर करणार आहेत. चित्रपटाबाबतची माहिती समोर आल्यानंतर प्रियंकाने स्वतः तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर ही बातमी शेअर करून चाहत्यांना आनंदाची बातमी दिली. तिच्या पोस्टवर अभिनेत्री दिया मिर्झानेही प्रतिक्रिया दिली आहे. सोशल मीडियावर प्रियंकाच्या चाहत्यांनीही उत्साह व्यक्त करत तिचं अभिनंदन केलं आहे. प्रियंका चोप्रा केवळ अभिनयच नाही तर निर्मिती क्षेत्रातही सक्रिय झाली आहे. विशेष म्हणजे ‘रीसेट’ या चित्रपटात ती अभिनेत्रीबरोबरच निर्मातीची भूमिकाही निभावणार आहे. त्यामुळे हा प्रोजेक्ट प्रियंकासाठी आणखी खास मानला जात आहे. या चित्रपटाच्या शूटिंगबाबतही महत्त्वाची माहिती समोर आली आहे. रिपोर्टनुसार, ‘रीसेट’ चित्रपटाचं शूटिंग ऑगस्ट महिन्यात सुरू होण्याची शक्यता आहे. सर्व्हायवल थ्रिलर प्रकारातील हा चित्रपट प्रेक्षकांसाठी एक वेगळा अनुभव ठरणार असल्याचं बोललं जात आहे. प्रियंका चोप्राने गेल्या काही वर्षांत हॉलिवूडमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. ‘सिटाडेल’ मालिकेपासून अनेक आंतरराष्ट्रीय प्रोजेक्ट्समध्ये तिने दमदार कामगिरी केली आहे. नुकताच तिचा ‘सिटाडेल २’ हा सीझन प्रदर्शित झाला असून त्यालाही प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. याशिवाय प्रियंका दिग्दर्शक एस. एस. राजामौली यांच्या मोठ्या बजेटच्या ‘वाराणसी’ या चित्रपटातही काम करत आहे. या चित्रपटात तिच्यासोबत अभिनेता महेश बाबू मुख्य भूमिकेत दिसणार आहे. ‘वाराणसी’ चित्रपटाचं शूटिंग सध्या सुरू असून हा चित्रपट पुढील वर्षी एप्रिलमध्ये प्रदर्शित होणार असल्याचं सांगितलं जात आहे. प्रियंकाच्या करिअरकडे पाहिल्यास तिने बॉलिवूडपासून हॉलिवूडपर्यंत यशस्वी प्रवास केला आहे. अभिनयासोबतच निर्मिती क्षेत्रातही ती स्वतःची छाप सोडताना दिसत आहे. त्यामुळे ‘रीसेट’ या नव्या चित्रपटाकडून तिच्या चाहत्यांच्या अपेक्षा आणखी वाढल्या आहेत.



# अक्षय कुमार रुग्णालयात दाखल



बॉलीवूड अभिनेता अक्षय कुमार त्याच्या फिटनेससाठी खास करुन ओळखला जातो. मात्र त्याच्याबाबत एक अपडेट समोर आली आहे. अक्षय कुमार सध्या रुग्णालयात ॲडमिट असल्याची माहिती समोर आली आहे. अक्षय कुमारच्या डोळ्याची सर्जरी करण्यात आल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अक्षय कुमार केरळमध्ये चित्रपटाचे शुटिंग करत होता. या चित्रपटाच्या शुटिंगदरम्यानच ६ मे रोजी त्याच्यावर शस्त्रक्रिया झाली. त्याच्यावर ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाली आहे. आता अभिनेता बरा होत आहे. मिडिया रिपोर्टनुसार, गेल्या काही दिवसांपासून अक्षय कुमारला डोळ्यांचा त्रास होत होता. ज्यामुळे त्याला ही शस्त्रक्रिया करावी लागली. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार, ही एक नियमित प्रक्रिया होती, असं सांगितलं आहे. शस्त्रक्रियेनंतर डोळ्यांना पूर्णपणे बरं होण्यासाठी वेळ मिळावा म्हणून विश्रांती घेण्याचा सल्ला देण्यात आली आहे. सध्या अक्षय कुमार ब्रेकवर असून तो आराम करत आहे. यानंतर थोड्या दिवसांनी अक्षय कुमार पुन्हा एकदा शुटिंग सुरू करणार आहे. दरम्यान, अक्षय कुमारच्या या आगामी चित्रपटाचे नाव अद्याप निश्चित झालेले नाही, परंतु यामध्ये विद्या बालन आणि राशी खन्ना देखील प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत.

# सगळ्यात मोठ्या आर्थिक संकटाची कहाणी!

गेल्या काही काळापासून सत्य घटनेवर आधारित चित्रपटांची संख्या वाढलेली दिसत आहे. या चित्रपटांना पाहणारा प्रेक्षकवर्ग देखील मोठा आहे. अशातच आता आणखी एक सत्य घटनेवर आधारित चित्रपटाचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. ‘द सायलेंट सेव्हियर गव्हर्नर’ असे या चित्रपटाचे नाव असून, या चित्रपटात बॉलिवूडमधील अनेकांचा आवडता अभिनेता मनोज बाजपेयी मुख्य भूमिकेत आहे. विशेष म्हणजे चित्रपटाचे दिग्दर्शन मराठी मनोरंजन विश्वातील गुणी अभिनेता चिन्मय मांडलेकरने केले आहे. ‘द केरळ स्टोरी’ आणि ‘द केरळ स्टोरी २ नंतर ‘गोज बियॉन्ड’च्या निर्मात्यांकडून आणखी महत्वाचा विषय या चित्रपटद्वारे दाखवण्यात येणार आहे. आज मनोज बाजपेयी यांचा वाढदिवस असल्याने टीझर रिलीज केला आहे.



# अन्वी हिंगेची बुद्धिबळात मोठी झेप

## वयाच्या नवव्या वर्षी 'डब्ल्यूसीएम' किताब

**महाईन्यूज । मुंबई**


**महाराष्ट्रातील चिंचवडच्या अन्वी हिंगेने जागतिक बुद्धिबळाच्या पटलावर मोठी झेप घेताना वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी 'महिला कँडिडेट्स मास्टर' (डब्ल्यूसीएम) किताब पटकावला. या किताबाची सर्वांत युवा मानकरी ठरण्याचा मान तिने मिळवला आहे.**



गेल्या महिन्यात स्पेनमधील ॲलिकांटे येथील प्रतिष्ठेच्या 'एक्स' स्पर्धेत अन्वीने ९ फेर्यांत ६.५ गुण मिळवले आणि या कामगिरीच्या जोरावर रेटिंगमध्ये ती थेट एलो १८०० गुणांच्याही पुढे गेली. स्पर्धेत ती एकूण संयुक्त चौथ्या क्रमांकावर राहिली. परंतु महिलांच्या गटात ती विजेती ठरली आणि जगातील सर्वांत युवा 'डब्ल्यूसीएम' बनली. यासह तिने ९ वर्षांखालील गटाच्या क्रमवारीत अग्रस्थानही पटकावले.

अन्वीने अतिशय लहान वयातच उल्लेखनीय यश मिळवले आहे. सात वर्षांखालील गटात राज्य विजेती, राष्ट्रीय स्पर्धेत कांस्यपदक विजेती अशी तिची कामगिरी आहे. २०२५ मध्ये ग्रीसमध्ये झालेल्या 'फिडे वर्ल्ड कॅडेट अँड यूथ' स्पर्धेत तिने आठ वर्षांखालील गटात रौप्यपदक जिंकले. तसेच मलेशियातील राष्ट्रकुल स्पर्धेतही ती उपविजेती ठरली. गतवर्षी ताजिकिस्तान येथे झालेल्या पश्चिम आशियाई युवा बुद्धिबळ स्पर्धेत तिने दोन सुवर्ण आणि चार रौप्यपदके पटकावली होती.


साडेचार वर्षांची असताना अन्वीला वडिलांनी पुण्यातील टॅक्टिकल मूव्हज बुद्धिबळ अकादमीमध्ये दाखल केले. सध्या ती ग्रँडमास्टर प्रवीण ठिपसे आणि फिडे मास्टर सिद्धांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते.




# 'बीसीसीआय'चे अहमदाबादप्रेम कायम; आयपीएल फायनल 'नरेंद्र मोदी स्टेडियम'वर

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) अहमदाबादप्रेम कायम असून इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) अंतिम सामन्याचे आयोजन हक्क पाच वर्षांत चौथ्यांदा 'नरेंद्र मोदी स्टेडियम'ला मिळाले आहेत. गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुच्या मैदानावर यंदाचा अंतिम सामना अपेक्षित होता. मात्र, जेतेपदाची लढत खेळवण्यासाठी आवश्यक अटींची पूर्तता करण्यात कर्नाटक राज्य क्रिकेट संघटनेला अपयश आल्याने सामना अहमदाबाद येथे हलविणे भाग पडल्याचे स्पष्टीकरण 'बीसीसीआय'कडून देण्यात आले आहे.**



'आयपीएल'च्या 'प्ले-ऑफ' लढतींचे वेळापत्रक बुधवारी जाहीर करण्यात आले. यंदा 'प्ले-ऑफ' लढती २६ मेपासून तीन वेगवेगळ्या मैदानांवर खेळवल्या जाणार आहेत. साखळी फेरीतील ७० सामने संपल्यानंतर अव्वल दोन संघांमधील 'क्वालिफायर-१' सामना २६ मे रोजी धरमशाला येथील 'एचपीसीए' स्टेडियमवर होईल. पंजाब किंग्ज संघाचे दुसरे घरचे मैदान असलेल्या धरमशालात प्रथमच 'प्ले-ऑफ' लढत होणार आहे. यानंतर २७ मे रोजी 'एलिमिनेटर' सामना न्यू चंडीगड (मुल्लानपूर) येथे होईल. त्याच मैदानावर २९ मे रोजी 'क्वालिफायर-२' लढत खेळवली जाईल. मग अंतिम लढत ३१ मे रोजी अहमदाबादेत होईल.

गतविजेते रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु संघाचे घरचे मैदान एम. चिन्नास्वामी स्टेडियमला अंतिम सामन्याचे यजमानपद देण्यात आलेले नाही. "अंतिम सामन्यासाठी सुरुवातीला बंगळूरुची निवड करण्यात आली होती. मात्र, स्थानिक संघटना आणि प्रशासनाकडून काही अशा मागण्या करण्यात आल्या, ज्या आमच्या नियमांमध्ये बसत नाहीत. त्यामुळे हा सामना दुसऱ्या ठिकाणी हलवण्यात आला आहे," असे 'बीसीसीआय'ने आपल्या निवेदनात म्हटले आहे. "नरेंद्र मोदी स्टेडियमची एक लाख ३२ हजार आसनक्षमता लक्षात घेऊन अंतिम सामना तेथे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या स्टेडियममध्ये मोठ्या प्रमाणात प्रेक्षक उपस्थित राहू शकतात, त्यामुळे महसूलही वाढतो," असे 'बीसीसीआय'च्या सूत्रांचे म्हणणे आहे.

कर्नाटक सरकारने राज्यातील आमदार, खासदार आणि विधान परिषद सदस्यांना प्रत्येकी तीन मोफत तिकिटांचा कोटा देण्याच्या निर्णयाला 'बीसीसीआय'ने विरोध दर्शवला असल्याचे समजते. चिन्नास्वामी स्टेडियमची आसनक्षमता ३५ हजार इतकी आहे. त्यातच गेल्या वर्षी रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुच्या विजयी मिरवणुकीदरम्यान स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे तेथील सुरक्षेबाबतही काही प्रश्न कायम आहेत.

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमला गेल्या पाच वर्षांत तब्बल सहा अंतिम लढतींच्या आयोजनाची संधी मिळाली आहे. यात 'आयपीएल'च्या चार अंतिम लढती (२०२२, २०२३, २०२५, २०२६), तसेच २०२३ एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा आणि २०२६ ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम लढतीचा समावेश आहे.

### कर्नाटक क्रिकेट संघटनेची नाराजी

'आयपीएल'चा अंतिम सामना बंगळूरुबाहेर हलविण्याच्या 'बीसीसीआय'च्या निर्णयावर कर्नाटक राज्य क्रिकेट संघटनेने (केएससीए) नाराजी दर्शवली आहे. या हंगामाच्या सुरुवातीला 'केएससीए'चे अध्यक्ष वेंकटेश प्रसाद यांनी बंगळूरुत सात सामने होणार असल्याचे सांगितले होते. यात रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु संघाचे पाच सामने, तसेच एक 'प्ले-ऑफ' लढत आणि अंतिम लढतीचा समावेश होता. मात्र, प्रत्यक्षात 'प्ले-ऑफ'मध्ये बंगळूरुला एकाही सामन्याच्या आयोजनाची संधी मिळणार नाही. "वेंकटेश प्रसाद सातत्याने 'बीसीसीआय'च्या संपर्कात होते. 'प्ले-ऑफ' सामन्यांच्या आयोजनासाठी 'केएससीए'ची तयारी आणि उत्सुकता याबाबत त्यांनी 'बीसीसीआय'ला अधिकृतपणे माहिती दिली होती. असे असूनही 'प्ले-ऑफ' सामन्यांच्या आयोजनाची संधी अन्य केंद्रांना दिली गेल्याने आम्ही निराश आहोत," असे 'केएससीए'चे प्रवक्ते विनय मृत्युंजय म्हणाले.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

। शुक्रवार ।

दि. 08 मे 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# गॅस दरवाढीविरोधात कष्टकरी संघर्ष महासंघाचा निषेध...

महाईन्यूज ।
पिंपरी- चिंचवड

**व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरवाढीविरोधात कष्टकरी संघर्ष महासंघ (महाराष्ट्र) तर्फे थरमॅक्स चौकात निदर्शने करण्यात आली. वाढत्या महागाईविरोधात कामगार, छोटे व्यावसायिक आणि नागरिकांनी या आंदोलनात सहभाग घेत सरकारच्या धोरणांचा निषेध केला.**

कामगार नेते काशिनाथ नखाते यांनी यावेळी बोलताना सांगितले की, “केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांमुळे महागाईचा भडका उडाला असून व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात ९९३ रुपयांनी झालेली वाढ ही केवळ गॅसपुरती मर्यादित नसून खाद्यपदार्थांच्या दरवाढीची सुरुवात आहे.”


ते पुढे म्हणाले की, “अवघ्या तीन महिन्यांत तब्बल ८१ टक्क्यांनी दर वाढले असून फेब्रुवारीपासून एकूण १३८० रुपयांची वाढ झाली आहे. या दरवाढीचा थेट परिणाम छोट्या व्यावसायिकांपासून सामान्य नागरिकांपर्यंत सर्वांवर होत आहे. मात्र, सरकारला याची कोणतीही दखल नसल्याचे दिसते.”

## दरवाढीचा दुहेरी फटका...

व्यावसायिक गॅस सिलिंडर दरवाढीमुळे छोटे व्यावसायिक, हॉटेल चालक, स्टॉलधारक यांना दर वाढविण्याचा किंवा तोटा सहन करण्याचा पर्याय उरला असून जीएसटी आणि महागाईच्या दुहेरी फटक्यामुळे सामान्य नागरिकांचेही आर्थिक कंबरडे मोडले आहे.

दरवाढीमुळे विद्यार्थी, कामगार, छोटे दुकानदार, नोकरदार आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. कॅन्टीन चालक, छोटे हॉटेल व्यावसायिक आणि स्टॉलधारकांना नाईलाजास्तव दर वाढवावे लागत असून, त्यामुळे ग्राहक कमी होण्याची भीती आहे. दर न वाढवल्यास आर्थिक तोटा सहन करावा लागतो, अशा दुहेरी संकटात छोटे व्यावसायिक सापडले असल्याचे नखाते यांनी नमूद केले. एकीकडे जीएसटीचा फटका आणि दुसरीकडे वाढती महागाई यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले आहे. सरकारने तातडीने महागाई नियंत्रणासाठी ठोस उपाययोजना कराव्यात आणि नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी कष्टकरी संघर्ष महासंघाकडून करण्यात आली.



# रक्षक चौक उड्डाणपुलाचे काम अंतिम टप्प्यात!

## औंध ते किवळे प्रवास होणार सिग्नलमुक्त : स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिपळे निलख येथील रक्षक चौकात सुरू असलेल्या उड्डाणपुलाचे काम आता पूर्णत्वाच्या टप्प्यावर आले असून, या पुलामुळे औंध ते सांगवी फाटा आणि रावेतपासून पुढे किवळेपर्यंतचा प्रवास लवकरच सिग्नलमुक्त आणि वाहतूककोंडीमुक्त होणार आहे. चिंचवड विधानसभेचे आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकल्पाची नुकतीच पाहणी करून सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. या संदर्भात प्रकल्पाची सविस्तर माहिती स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी दिली.**



या महत्त्वपूर्ण प्रकल्पाबाबत आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपळे गुरव येथील जनसंपर्क कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांची बैठकही पार पडली.

या प्रकल्पाच्या पाहणीवेळी नगरसेविका आरतीताई चोंधे, नगरसेविका स्नेहाताई कलाटे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, युवा मोर्चाचे माजी शहराध्यक्ष संकेत चोंधे, युवा मोर्चा सरचिटणीस प्रसाद कस्पटे, सनी बारणे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. रक्षक चौक हा शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत कळीचा टप्पा मानला जातो. आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या सूचनेनुसार, या ठिकाणी पुलाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यासाठी आणि पुढील नियोजनासाठी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यामध्ये पुलाच्या कामासह संलग्न असलेल्या बीआरटी बस वाहतुकीचे नियोजन कसे असेल, यावर विशेष भर देण्यात आला. बस प्रवासी आणि त्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश यावेळी प्रशासनाला देण्यात आले आहेत. तसेच पुलाचे रेलिंग आणि संपूर्ण कामाचे तातडीने 'सेफ्टी ऑडिट' करण्याच्या सूचनाही संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. या उड्डाणपुलामुळे नागरिकांच्या वेळेची आणि इंधनाची मोठी बचत होणार असून, सांगवी-किवळे या संपूर्ण बीआरटी मार्गावरील वाहतूक अधिक वेगवान होणार आहे.

रक्षक चौकातील उड्डाणपुलाचे काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्यावर प्रशासनाचा भर आहे. या पुलामुळे परिसरातील वाहतूक कोंडी सुटण्यास मोठी मदत होणार असून प्रवाशांचा वेळ वाचणार आहे. कामात प्रवाशांच्या सुरक्षिततेची पूर्ण काळजी घेण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि पायाभूत सुविधांच्या सक्षमीकरणासाठी महापालिका सातत्याने प्रयत्नशील असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

> " आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकल्पाचा आढावा घेतला असून, हा पूल लवकरात लवकर नागरिकांच्या सेवेसाठी खुला करण्याचे नियोजन आहे. प्रवाशांचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित व्हावा, यासाठी सेफ्टी ऑडिटबाबत कडक सूचना दिल्या आहेत. पिंपरी-चिंचवडच्या शाश्वत विकासासाठी आणि सुलभ वाहतुकीसाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> **- अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महापालिका.**

## येत्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्तीपूर्व सूक्ष्म नियोजनावर भर द्यावा; आयुक्त

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**येत्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवून आपत्तीपूर्व सूक्ष्म नियोजनावर भर द्यावा. शहरात पाणी साचणाऱ्या ठिकाणांची ओळख करून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात व नालेसफाईची कामे वेळेत पूर्ण करावीत. तसेच पूरप्रवण भागांतील नागरिकांच्या स्थलांतराचे पूर्वनियोजन करावे आणि आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवावी, असे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत माजी महापौर मधुकरराव पवळे सभागृहात मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठक आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, येत्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व विभागांनी आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी यंत्रणा पूर्णपणे सज्ज ठेवून आपत्तीपूर्व सूक्ष्म नियोजन करणे अत्यावश्यक आहे. शहरामध्ये ज्या ठिकाणी पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणावर साचते, अशा ठिकाणांची तात्काळ ओळख करून तेथे कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच नालेसफाईची सुरू असलेली सर्व कामे तातडीने पूर्ण करून पावसाळ्यापूर्वी शहर जलनिकासी सक्षम करावी. याशिवाय, महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये अखंडित विद्युत पुरवठा सुनिश्चित करण्यात यावा, तसेच आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक तेवढे बेड्स राखीव ठेवण्याचे नियोजन करावे. पूरजन्य परिस्थितीमध्ये बाधित नागरिकांसाठी शाळा व इतर निवारा केंद्रांचे नियोजन करून त्या ठिकाणी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध राहतील, याची दक्षता घ्यावी. नदीकाठच्या व पाणी शिरण्याचा धोका असलेल्या भागांतील नागरिकांचे वेळेवर सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्याचे नियोजन करावे.

शहरातील धोकादायक इमारतींची तात्काळ पाहणी करून संबंधितांना नोटीस देण्यात यावी व अशा ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवण्याची कार्यवाही करावी. तसेच अनधिकृत व धोकादायक होर्डिंग्ज तातडीने काढून टाकावीत. होर्डिंगधारकांसमवेत नियमित बैठकांचे आयोजन करून नियमांची माहिती द्यावी व नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी. तसेच आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तात्काळ मदत मिळावी यासाठी 'क्विक रिस्पॉन्स टीम' कार्यरत ठेवण्यात याव्यात. या पथकांमध्ये आपत्ती व्यवस्थापन, अग्निशमन, आरोग्य, विद्युत, स्थापत्य व उद्यान विभागातील कर्मचाऱ्यांचा समावेश असावा. सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवून कार्य करावे, तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रभागातील आपत्कालीन यंत्रणा सक्षम ठेवावी.

पावसाळ्यात साथीचे रोग पसरू नयेत यासाठी आरोग्य विभागामार्फत नियमित साफसफाई, निर्जंतुकीकरण व धुरीकरण करण्यात यावे. शहरात स्वच्छ पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी. झाडपडीच्या घटनांवर लक्ष ठेवून अशा घटना घडल्यास तात्काळ झाडांच्या फांद्या हटवून वाहतूक सुरळीत ठेवावी. तसेच रस्त्यांवरील खड्डे पावसाळ्यापूर्वी बुजवून नागरिकांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी. पाणी साचणाऱ्या ठिकाणी पर्यायी मार्गांची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी. याव्यतिरिक्त, नदीपात्राजवळील धोकादायक अतिक्रमणे ओळखून ती तातडीने हटवावीत. रस्त्यांवर सुरू असलेल्या स्थापत्य कामांदरम्यान योग्य बॅरिकेडिंग करणे बंधनकारक आहे. शहरातील सीसीटीव्ही यंत्रणा तपासून नादुरुस्त कॅमेरे दुरुस्त करावेत व मध्यवर्ती पूरनियंत्रण कक्षामार्फत सातत्याने देखरेख ठेवावी. पावसाळ्यात नागरिकांना सतर्क करण्यासाठी सूचना फलक दर्शनी ठिकाणी लावावेत, अशा स्पष्ट सूचना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी यावेळी दिल्या.

बैठकीदरम्यान, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे यांनी मान्सूनपुर्व काळात आणि आपत्कालीन परिस्थितीत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची सविस्तर माहिती संगणकीय सादरीकरणाद्वारे दिली.

# युवा खेळाडूंना दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका कटिबद्ध; महापौर

## महापौर चषक कबड्डी स्पर्धेला उत्साहात प्रारंभ; राज्यभरातील ८१२ खेळाडूंचा सहभाग

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**कबड्डी हा आपल्या मातीतला आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीशी जोडलेला खेळ आहे. युवा खेळाडूंना दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि ग्रामीण भागातील प्रतिभेला संधी देणे, हा महापौर चषक स्पर्धेच्या आयोजनामागील मुख्य उद्देश आहे. पिंपरी चिंचवड शहर क्रीडा क्षेत्रातही अग्रस्थानी राहावे, यासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे,' असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने भोसरी येथील गावजत्रा मैदानात आयोजित करण्यात आलेल्या 'महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा २०२६' चे उदघाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी आमदार महेश लांडगे, शंकर जगताप यांच्यासह स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, पीएमपीएल अध्यक्ष डॉ. महेश आव्हाड, क्रीडा, कला, साहित्य आणि सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, नगरसदस्य योगेश लांडगे, कुंदन गायकवाड, उपायुक्त पंकज पाटील, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे उपखजिनदार प्रकाश बालवडकर, सहसचिव राजाभाऊ ढमढेरे, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते विराज लांडगे, राष्ट्रीय खेळाडू मच्छिंद्र लांडगे,पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला अध्यक्षा कविता आल्हाट, पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे माजी सचिव राजाभाऊ आंदेकर तसेच सहसचिव संदीप पायगुडे,सामाजिक कार्यकर्ते राहूल लांडगे,स्वप्रील लांडगे,शिवराज काटे यांच्यासह खेळाडू आणि नागरिक उपस्थित होते.

महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा ही १० मेपर्यंत चालणार असून, या स्पर्धेत राज्यभरातील नामांकित कबड्डी संघांच्या एकूण ८१२ खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे. यामध्ये पुरुष गटातील ३६ आणि महिला गटातील २४ संघ आहेत. स्पर्धेचे सामने सुरळीत आणि शिस्तबद्ध पार पडावेत, यासाठी तब्बल ५५ सामनाधिकारी कार्यरत आहेत.

महापौर रवि लांडगे म्हणाले,' राज्यस्तरीय स्तरावर होत असलेल्या या स्पर्धेमुळे पिंपरी चिंचवड शहरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले असून, युवा खेळाडूंना मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. कबड्डीसारख्या मातीतल्या खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी महानगरपालिका सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे, असे देखील त्यांनी सांगितले.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, 'पिंपरी चिंचवड शहरातील क्रीडा संस्कृती अधिक बळकट करण्यासाठी अशा राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन अत्यंत आवश्यक आहे. कबड्डीसारख्या पारंपरिक खेळांना प्रोत्साहन मिळाल्यास ग्रामीण भागातील खेळाडूंना मोठ्या स्तरावर आपली क्षमता सिद्ध करण्याची संधी मिळते.'

आमदार शंकर जगताप म्हणाले की,'युवा पिढीने खेळांकडे करिअरच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. पिंपरी चिंचवड शहरात विविध उपक्रम राबवत खेळाडूंना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.'

स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे म्हणाले की, 'महापौर चषक स्पर्धेमुळे राज्यभरातील खेळाडूंना एक दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. शहरात अशा स्पर्धांमुळे क्रीडाप्रेमी नागरिकांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण होत आहे.'

सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे म्हणाले की,'कबड्डी हा महाराष्ट्राच्या संस्कृतीशी जोडलेला खेळ असून त्याच्या संवर्धनासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. युवा खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी महानगरपालिका सातत्याने कार्यरत आहे.'

क्रीडा, कला, साहित्य आणि सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे म्हणाले की, 'महापौर चषक स्पर्धेमध्ये राज्यभरातील संघांचा उत्स्फूर्त सहभाग लाभल्याबद्दल समाधान वाटते. आगामी काळात आणखी मोठ्या प्रमाणात क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून शहराची क्रीडा ओळख अधिक मजबूत करण्यात येईल.'

### १७ लाख ५० हजार रुपयांची पारितोषिके

या स्पर्धेत विजयी होणाऱ्या संघांना रोख बक्षिसे आणि आकर्षक सन्मानचिन्हे प्रदान करण्यात येणार आहेत. पुरुष व महिला गटातील प्रथम क्रमांकाच्या संघाला प्रत्येकी २ लाख रुपये, द्वितीय क्रमांकासाठी १ लाख ५० हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी १ लाख रुपये तसेच चतुर्थ क्रमांकासाठी १ लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे. तसेच उपउपांत्य फेरीत प्रवेश करणाऱ्या प्रत्येक पुरुष व महिला संघास प्रत्येकी २५ हजार रुपयांचे प्रोत्साहनपर बक्षीस दिले जाणार आहे. याशिवाय उत्कृष्ट खेळाडूंनाही विशेष वैयक्तिक पुरस्कार देण्यात येणार असून "दिवसाचा मानकरी", "उत्कृष्ट चढाई", "उत्कृष्ट पकड" आणि "अष्टपैलू खेळाडू" या विभागांमध्ये रोख पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. स्पर्धेतील एकूण बक्षीस रक्कम १७ लाख ५० हजार रुपये इतकी असून, त्यामुळे राज्यभरातील कबड्डीपटूंमध्ये या स्पर्धेबाबत मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

## महाळुंगे एमआयडीसी पोलिसांची धडाकेबाज कारवाई; सराईत दुचाकी चोरट्यांना अटक

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**दक्षिण महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने मोटारसायकल चोरी करणाऱ्या सराईत चोरट्यांविरोधात मोठी कारवाई करत तब्बल ३६ लाख रुपये किमतीच्या २४ मोटारसायकली जप्त केल्या आहेत. या कारवाईमुळे पुणे, नवी मुंबई, मुंबई, ठाणे, नाशिक आणि अहिल्यानगर परिसरातील अनेक दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.**



महाळुंगे औद्योगिक वसाहतीतील उद्योग तसेच विविध कंपन्यांमधील वाहन चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. त्याअंतर्गत दक्षिण महाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी ही उल्लेखनीय कामगिरी बजावली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ एप्रिल २०२६ रोजी पानसे ऑटो प्रा. लि. कंपनीसमोरील पार्किंगमधून स्प्लेंडर मोटारसायकल (एमएच १४ एनसी ६४६३) अज्ञात चोरट्यांनी चोरी केली होती. याप्रकरणी फिर्यादी संदीपकुमार किशोरी सरन निसाद यांच्या तक्रारीवरून दक्षिण महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३०३(२), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याच्या तपासासाठी पोलीस उपआयुक्त श्वेता खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक तयार करण्यात आले. तपासादरम्यान पोलिसांनी महाळुंगे ते जुन्नर असा जवळपास ८० किलोमीटर परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात आला.

तपासात यश सुनिल हांडे (वय १९, रा. पिंपळगाव सौदा, ता. जुन्नर) आणि किरण संभाजी जाधव (वय २६, रा. टिकेकरवाडी, ता. जुन्नर) यांनी चोरी केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेत कसून चौकशी केली असता त्यांनी पुणे, नवी मुंबई, बृहन्मुंबई, ठाणे, नाशिक आणि अहिल्यानगर परिसरातून अनेक मोटारसायकली चोरी केल्याची कबुली दिली. या आरोपींकडून विविध कंपन्यांच्या एकूण २४ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या असून त्यांची किंमत सुमारे ३६ लाख रुपये इतकी आहे. या कारवाईमुळे अनेक प्रलंबित वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आले असून औद्योगिक परिसरातील वाहनचोरी करणाऱ्या टोळ्यांवर पोलिसांनी मोठा आळा घातल्याचे बोलले जात आहे.

दक्षिण महाळुंगे एमआयडीसी पोलिसांच्या या कारवाईचे उद्योग क्षेत्रातून तसेच नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# सांडपाणी नदीत सोडणाऱ्या पीएमआरडीए हद्दीतील सोसायट्यांवर गुन्हे दाखल करा

## खासदार श्रीरंग बारणे : मावळ मतदारसंघातील विकास कामांचा आढावा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए)कडून पवना आणि इंद्रायणी नदीपात्रात लगत परवानगी दिलेल्या सोसायट्यांची पाहणी करावी. एसटीपी चालू आहेत की नाही हे तपासावे. थेट नदीत सांडपाणी सोडण्याऱ्या सोसायट्यांवर गुन्हे दाखल करावेत. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळालाही कळविण्यात यावे. पर्यावरण आणि नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा इशारा खासदार श्रीरंग बारणे यांनी दिला.**




पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीतील मावळ लोकसभा मतदारसंघातील विकास कामांचा खासदार बारणे यांनी गुरुवारी आढावा घेतला. आयुक्त अभिजीत चौधरी अतिरिक्त आयुक्त के. मंजूलक्ष्मी, पोलीस दक्षता अधिकारी अमोल झेंडे, वित्तीय नियंत्रक जितेंद्र कोलंबे, सह आयुक्त रुपाली आवले डंबे, सह आयुक्त पुनम मेहता, हिम्मत खराडे, मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे, मुख्य अभियंता अभियांत्रिकी विभाग शिवप्रसाद बागडी, रिनाज पठाण, उपसंचालक स्मिता कलकुटकी, संचालक विकास परवानगी विभाग अविनाश पाटील तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, मावळ तालुक्यात किल्ले आहेत. त्यामुळे पर्यटकांची संख्या जास्त असते. त्यांना सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जाव्यात. लोहगडवरून विसापूरकडे जाणारा रस्ता विकसित करावा. लोहगड पायथ्याशी शिवसृष्टी उभारण्यात यावी. भाजे लेणीपासून लोहगडकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला सुरक्षा कठडे लावावेत. कारला फाटा ते मळवली हा रस्ता मंजूर असून त्याचे काम तत्काळ सुरू करावे. देहू ते येलवाडी या तळेगावला जोडणाऱ्या रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. वाहने जाणे कठीण झाले आहे. देहू, भंडारा डोंगर येथे येणाऱ्या वारकऱ्यांची संख्या जास्त असते. या रस्त्याची तत्काळ दुरुस्ती करावी.

तत्कालीन नवनगर विकास प्राधिकरणासाठी जागा दिलेल्या शेतकऱ्यांना शासन निर्णयानुसार तत्काळ परतावा द्यावा. कागदपत्रांमध्ये त्रुटी काढून शेतकऱ्यांना हेलपाटे मारायला लावले जाते. शेतकऱ्यांना तत्काळ सव्वा सहा टक्के परतावा देण्याची सूचना खासदार बारणे यांनी दिल्या.

### पवना नदीवरील पुलाचे काम तत्काळ पूर्ण करा

पवना नदीच्या उगमापासून पिंपरी-चिंचवडपर्यंत नदी काठच्या गावाचे सर्वेक्षण करावे. नदी काठच्या गावात एसटीपी उभारावेत. नदी स्वच्छ ठेवण्यासाठी पीएमआरडीएने पुढाकार घ्यावा. किवळे ते सांगवडे दरम्यान पवना नदीवर महापालिका आणि पीएमआरडीएच्या वतीने पूल उभारण्यात येत आहे. महापालिका क्षेत्रातील काम झाले आहे. सांगवडे हद्दीत जागा ताब्यात नाही. त्यामुळे काम रखडले आहे. जागा ताब्यात घेऊन काम मार्गी लावावे, अशी सूचना खासदार बारणे यांनी केली.

### लक्ष्मी चौकातील कोंडी फोडा

भूमकर चौकातून लक्ष्मी रस्त्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. लक्ष्मी चौक – मारुंजी रोड परिसरात अनधिकृत विक्रेत्यांमुळे प्रचंड मोठी वाहतूक कोंडी निर्माण होते. हिंजवडी, वाकडकडून येणाऱ्या वाहनांमुळे लक्ष्मी चौकातील कोंडीत मोठी भर पडते. येथे अतिक्रमणे झाली आहेत. त्यावर कारवाई करून चौक कोंडीमुक्त करावा, अशी सूचना खासदार बारणे यांनी केली.

# मॅगझीन चौक परिसरात अश्लील प्रकारांवर पोलिसांची कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आळंदी-पुणे रोडवरील मॅगझीन चौक परिसरात सार्वजनिक ठिकाणी अश्लील हावभाव करत येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना त्रास देणाऱ्या दोन महिलांविरोधात दिघी पोलिसांनी कारवाई केली आहे.**



या प्रकरणी अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ६ मे २०२६ रोजी सायंकाळी पावणेसहाच्या सुमारास आळंदी-पुणे रोडवरील मॅगझीन चौक परिसरात ही कारवाई करण्यात आली.

याप्रकरणी पोलीस शिपाई सोमनाथ बाळू खळसोडे (पो.शि. ३०६३) यांनी दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादींच्या म्हणण्यानुसार, संबंधित महिला रस्त्यावरून येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना अश्लील हावभाव करत तसेच अश्लील शब्द उच्चारून त्यांना अडथळा निर्माण करत होत्या.

यातील एका महिलेने, अश्विनी प्रकाश जाधव हिने फिर्यादींच्या अंगावर हात फिरवत अश्लील वर्तन केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकारामुळे परिसरातील सार्वजनिक सभ्यता व शिष्टाचाराचा भंग होत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

यानंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत संबंधित दोन महिलांविरोधात गुन्हा दाखल केला. आरोपी महिलांना बीएनएसएस कलम ३५(३) प्रमाणे नोटीस बजावण्यात आली आहे.

या प्रकरणी दिघी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. २०५/२०२६ अन्वये अनैतिक व्यापार प्रतिबंधक (पिटा) अधिनियम १९५६ चे कलम ०८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास मपोउनि भोईर करीत आहेत.